TM


मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ...

ता.जि.ठाणे-४०१ १०१.दुरध्वनी क्र. ...

जनसंपर्क विभाग


जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ 2C /२०२२-२३ दि.:- 22 / 8 /२०२२

प्रति,

मा.संपादक/जाहिरात व्यवस्थापक

दैनिक/सा. ---- लोकमत ----

-----------------------------------

-----------------------------------

विषय :- वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांनुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मिरा भाईंदर महानगरपालिकेची जाहिरात दि.23 / 8 /२०२२ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

जाहिरात प्रसिध्दीकरिता सुचना :-

१) सदर जाहिरात हि शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करणे, आपणांस बंधनकारक राहील.

२) सदर जाहिरातीत १० फॉन्टपर्यंतच्या साईजच्या व कमीत-कमी जागेचा वापर करुन जाहिरात प्रसिध्द करावी.

३) सदर जाहिंरात प्रसिध्द करतेवेळी महानगरपालिकेचा लोगो प्रसिध्द करणे आवश्यक राहील.

४) सदर जाहिरातीत www.mbmc.gov.in या महानगरपालिकेच्या वेबसाईटचा उल्लेख करावा.

५) जाहिरात प्रसिध्द करतेवेळी जनसंपर्क विभागातील जावक क्रमांकाचा उल्लेख करावा.

६) जाहिरातीत छपाई चुक झाल्यास, आपणांस विनामुल्य पुढील अंकात जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

७) जाहिरात प्रसिध्द केलेबाबत वृत्तपत्राच्या चार प्रती दुस-या दिवशी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

८) जाहिरात प्रसिध्द केलेले वर्तमान पत्राचे बिल १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावे.

९) पाठविलेल्या आर.ओ. मध्ये कुठलाही फेरफार करु नये.

१०) पाठविलेला आर.ओ. आपल्याच वृत्तपत्राच्या नावानिशी पाठविला आहे, याची खात्री करावी व त्यानंतरच वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी.

११) काही शंका असल्यास जनसंपर्क विभागाशी संपर्क करावा.

वरील सुचनांचे अधीन राहून, काटेकोरपणे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

(राजकुमार घरत)

प्र.जनसंपर्क अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहिरात

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

## राष्ट्रीय जंतनाशक दिन - दिनांक : २५ एप्रिल २०२२

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनानुसार मातीतून प्रसार होणाऱ्या कृमींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तसेच मुलांची पोषण स्थिती, शिक्षण, चांगले आरोग्य व जीवनाचा दर्जा उंचावणे हे उद्दिष्ट समोर ठेवून शासन आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना दि.२५ एप्रिल २०२२ रोजी शाळा, महाविद्यालये व अंगणवाडी स्तरावरुन तसेच दि.२५ एप्रिल २०२२ ते दि.०२ मे २०२२ या कालावधीत शाळेत न जाणाऱ्या मुलामुलींना आशावर्कर मार्फत समुदाय स्तरावरून जतांची गोळी खाऊ घालण्यात येणार आहे. तसेच ज्या मुलामुलींना जंतनाशक दिनाच्या दिवशी गोळाचा लाभ मिळाला नसेल अश्या मुलामुलींना दि.२९ एप्रिल २०२२ या मॉप अप दिनी जंताची गोळी खाऊ घालून सदर जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. दि.२५ एप्रिल २०२२ रोजी सदर मोहीमेचा लाभ घेणेकरीता १०० टक्के मुलामुलींची उपस्थिती राहील याबाबत सर्व शासकीय व खाजगी शाळांना कळविण्यात आले आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी आपल्या १ ते १९ वयोगटातील सर्व मुलामुलींना जंतनाशक मोहिमेचा लाभ द्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे** | **श्री.हसमुख गहलोत** | **श्री.दिलीप ढोले** |
| महापौर | उपमहापौर | आयुक्त |

आ.क्र. मभमपा/जनसंपर्क/२८/2022-23
दि. २२/०४/२०२२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९९०९३
ई-मेल: mohmbmc४@gmail.com / moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## वैद्यकीय आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/वैद्यकीय/ ९५३ /२०२२ -२३ दिनांक:- २२/०४/२०२२.

प्रति,
जनसंपर्क विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

जनसंपर्क विभाग
आवक क्र. २८
दिनांक 22/4/2022

**विषय :- राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिमेची जाहिरात देणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये शासन आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना जंतनाशक गोळ्या खाऊ घालून सर्व शाळा, अंगणवाडी व समुदाय स्तरावर दि.२५/०४/२०२२ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन व दि.२९/०४/२०२२ रोजी मॉपअप दिन मोहिम राबविण्यात येणार आहे.

सदर मोहीमेची वर्तमान पत्रात प्रसिद्धीकरीता रु. २५,००० निधी शासनामार्फत प्राप्त झालेला असून दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात सदर मोहीमेची जाहिरात (साईज "१६X१२", १९२ चौ.सेमी.) या आकारात प्रसिद्ध करण्याकरीता एकुण रक्कम २१,७७३ रुपये खर्च असल्याचे आपल्या कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या कार्यादेशावर दिसून येत आहे. तरी सोबत दिलेल्या जाहिरातीचा खर्च रु. २५,००० च्या आतच होईल, याची दक्षता घ्यावी व सदरचे देयक वैद्यकीय विभागात वर्ग करण्यात यावे. सदर जाहिरात दि. २३/०४/२०२२ किंवा २४/०४/२०२२ रोजीच्या दैनिक लोकमत वर्तमापत्रात प्रसिद्ध करण्यात यावी.

सोबत जाहिरात जोडली आहे.

(स्वाक्षरी)
(डॉ. नंदकिशोर लहाने)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\Velu Velencia Lita Sister\जंतनाशक गोळयाबाबत.doc